
■ प्रेमचंदांच्या 'कफन'वर चित्रपट

प्रसिद्ध हिंदी साहित्यिक मुन्शी प्रेमचंद यांच्या लोकप्रिय साहित्यकृतींवर आजवर अनेक दर्जेदार कलाकृतींची निर्मिती झालेली आहे. त्यात आणखी एका साहित्यकृतीची भर पडणार आहे. प्रेमचंद यांच्याच 'कफन'वर आधारित एक चित्रपट दिग्दर्शक ऋषी जेना बनवत आहेत. *बसेरा*सारख्या अनेक हिंदी-गुजराती मालिकांच्या निर्मात्या सुशीला भाटिया याच्या निर्मात्या आहेत. वनराज भाटिया यांनी या चित्रपटाला पार्श्वसंगीत दिलेलं असून *सरफरोश*चे पुरस्कार विजेता



नेत्रा रघुरामन आणि राजपाल यादव.

संकलक जफर सुल्तान त्याचं संकलन करणार आहेत. राजपाल यादव, नेत्रा रघुरामन आणि साधू मेहर हे यातील मुख्य कलाकार आहेत. ही एका अशा पिता-पुत्राची कथा आहे जे घरातल्या सुनेच्या कफनासाठी गावकऱ्यांनी दिलेले पैसेही खाण्या-पिण्यावर उडवतात. ह्या चित्रपटाचं चित्रीकरण उत्तर प्रदेशातील ग्रामीण भागात करण्यात आलं असलं तरी याची भाषा मात्र शुद्ध हिंदीच आहे. भोजपुरी किंवा अवधी भाषेत संवाद नाहीत. चित्रपटाची पटकथा-संवाद ऋषी जेना यांनीच लिहीलेत.

■ विपाशाची झेप

१८ जुलै रोजी जुहू जागृती ऑडिटोरियममध्ये विपाशा या तरुण गुजराती कवयत्रीच्या 'उपटेला रंगोथी रिसायेली भींतो' या पहिल्या वहिल्या काव्यसंग्रहाचं प्रकाशन करण्यात आलं. अलिकडेच पी.एच.डी.ची डिग्री मिळवणारी ही तरुण कवयत्री अपंग आहे. ती धड चालू शकत नाही, लिहू शकत नाही, इतकंच नाही तर पुस्तकाचं पान उलटण्यासाठीही तिला दुसऱ्याची मदत घ्यावी लागते. पण आपल्या या अपंगत्वावर मात करून तिने अतिशय सुंदर सुंदर अर्थपूर्ण काव्यलेखन केलंय. तिच्या कवितांचं वाचन प्रसिद्ध कवी, गीतकार, दिग्दर्शक गुलजार यांनी स्वतः करून विपाशाचं कौतुक केलं. मुंबईबरोबरच गुजरात आणि दिल्लीतही या काव्यसंग्रहाचं प्रकाशन झालं.



खंबीर तरीही हळवी विपाशा

■ आणखी एक *खजाना*

पुन्हा एकदा गझलांचा उत्सव सुरू झालाय. अनुप जलोटा, भूपिंदर आणि मिताली सिंग, पिनाज मसानी, घनश्याम वासवानी, राजेन्द्र आणि नीना गुप्ता, तलत अजिज, अहमद हुसेन आणि मोहम्मद हुसेन तसंच पंकज उधास यांच्यासारख्या सदाबहार गझल गायकांच्या गझल्सचा उत्सव ओबेरॉय हॉटेलमध्ये ३० आणि ३१ जुलै रोजी रात्री साजरा झाला. मुंबईबरोबरच भारताच्या इतर शहरांतही अशा प्रकारचा गझल उत्सव साजरा करण्याचा कार्यक्रमाचे मुख्य आयोजक पंकज उधास यांचा विचार आहे. इतकंच नाही तर, पुढच्या वर्षी आपल्या या टीमसह पाकिस्तानचा दौरा करण्याचा मानसही त्यांनी २३ जुलै रोजी आयोजित एका पत्रकार परिषदेत व्यक्त केला. कॅन्सर पेशन्ट्स असोसिएशन आणि पॅरेन्ट्स असोसिएशन थेलेसेमिक युनिट ट्रस्टच्या सहयोगाने पंकज उधास यांच्या *खजाना* या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं.

■ गायिका कंचन बाबला यांचं निधन

कल्याणजी-आनंदजी यांचे लहान भाऊ बाबला यांच्या गायिका पत्नी कंचन यांचं नुकतंच अल्पशा आजाराने निधन झालं. *कुर्बानी* चित्रपटातील 'लैला ओ लैला...' हे गीत त्यांनी गायलं होतं आणि ते बरंच लोकप्रियही झालं होतं. त्यांनी आपल्या कारकीर्दीची सुरुवात *रफूचक्कर* चित्रपटाने केली होती. कल्याणजी-आनंदजींनी त्यात त्यांना पहिल्यांदा संधी दिली होती. त्यांनी लक्ष्मीप्रसाद जयपुरवाला यांच्याकडे संगीताचं प्रशिक्षण घेतलं होतं. रिदम कंपोझर बाबला यांच्याशी विवाहबद्ध झाल्यावर या पती-पत्नीने आपला स्वतःचा ऑर्केस्ट्रा ग्रुप बनवला होता. जगभरात त्यांनी स्टेज शोज केले, अनेक अल्बम बनवले. पैकी १९८२ साली रिलीज झालेल्या *कैसे बनी* अल्बममधलं भोजपुरी शैलीतलं 'कैसे बनी कैसे बनी गुलोरी बिना चटनी कैसे बनी...' खूपच लोकप्रिय झालं होतं.



'लैला मैं लैला...' गाणारी कंचन

असं म्हणतात की, फ्रॅक्चरवरील ट्रीटमेंट दरम्यान देण्यात आलेल्या ॲन्टि-बायोटिक्समुळे त्यांची प्रकृती अधिक गंभीर झाली होती आणि त्यातून त्या वाचल्याच नाहीत. त्या फक्त ५४ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात पती बाबला, कन्या निशा आणि मुलगा वैभव आहेत.

■ रक्षंदा खान सहारावर

*जस्सी जैसी कोई नही*मधली मलिका ऊर्फ रक्षंदा खान आता सहारा टीव्हीवरील *रात होने को है* या हॉरर मालिकेत एका भूतबाधित लहान मुलाच्या आईचा रोल करतेय. हॉरर मालिकेत काम करत असले तरी मला भूताची खूप भीती वाटते, असं रक्षंदाने हसत हसत पत्रकारांना सांगितलं.